# समाजस्वास्थ्य

संपादक
र. धों. कर्वे, एम.ए.

वर्ष २६, अंक ३ रा | १५ सप्टेंबर १९५२ | किंमत ४ आणे



# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | विवाह आणि प्रजोत्पत्ति-४ ... ... | ४५ |
| २. | प्राचीन भारतांतील कांही विकृत लैंगिक आचार | ५० |
| ३. | पत्रव्यवहार ... ... ... ... | ५६ |
| ४. | शारदेचें पत्र ... ... ... ... | ६० |


## अेजंटांचीं नांवें

**मुंबई :** श्री. बागवे, न्यूज एजंट, खटाववाडी, गिरगांव.

**पुणें :** अेल्. के. जोशी, बुकसेलर.
डी. अेच्. शहा, बुकसेलर.

**अहमदनगर :** पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ

**निपाणी :** के. एस्. बळगुर्गी

**कुमठा :** आर्. एम्. कामत

**गोकाक :** पी. एम्. शिरगांवकर


अेका सदभिरुचिसंपन्न, कुलीन, निरोगी, अव्यंग, देखण्या, उंच, ब्रह्मचारी, तिशीच्या तरुणाला केवळ अेकाच सम्मीलनार्थ शक्य तर वरील गुणांना जुळणाऱ्या कुमारिका तरुणीशीं पत्रव्यवहार-परिचय हवा. पत्रव्यवहार गुप्त. स्वतः कुमारिकांनी लिहावें. Q c/o **समाजस्वास्थ्य मासिक**, १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई-४.

अव्यंग, सुस्वरूप, मनमिळावू व विचारी तरुणास तरुणीचा **सहवास मैत्री पाहिजे** पत्रव्यवहार गुप्त. **प्र.** C/o **समाजस्वास्थ्य,** १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई नं. ४.

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# विवाह आणि प्रजोत्पत्ति–४

वरील विवेचनावरून हें उघड दिसतें की विवाहसंस्था या शब्दांना कांही निश्चित अर्थ नाही. विवाहाचीं ठिकठिकाणचीं रूपें अितकीं भिन्न आहेत की त्या सर्वांना मिळून एकच शब्द कसा लावावा अशी शंका येते. प्राचीन रोमन लोकांत विवाह हा अेक सामान्य करार असे आणि त्याचा कोणताही ठराविक विधि नसे. पुढें सर्व महत्वाच्या कारभारांत ढवळाढवळ करण्याच्या धार्मिक अधिकाऱ्यांच्या नेहमीच्या पद्धतीमुळें विवाहाचे वेळीं पाद्री हजर असलाच पाहिजे असा नियम करण्यांत आला, पण तरीही बरींच शतकें तो अमलांत आला नाही. कोणातरी साक्षीदारासमक्ष वधूवरांनी अेकमेकांना वरण्याची तयारी दर्शवली म्हणजे तो विवाह होत असे. अितकेंच नव्हे तर सोळाव्या शतकापर्यंत यूरोपांत अेकत्र राहिलेलें कोणतेंही जोडपें विवाहित समजण्यांत येत असे. आपल्याकडेही प्राचीन काळीं गांधर्वविवाह रूढ होता आणि त्यांत कोणताही विधि नव्हता. फक्त दोघांची संमति असली म्हणजे झालें.

यूरोपांत 'कौन्सिल ऑफ ट्रेंट' नांवाची धर्माधिकाऱ्यांची प्रख्यात सभा १५६३ सालीं बोलावली गेली. याच सभेंत स्त्रियांना आत्मा आहे की नाही यासंबंधी विचार होऊन अस्तिपक्षीं अेक मत जास्त पडल्यामुळें स्त्रियांना आत्मा आहे असें ठरलें आणि त्याच सभेंत विवाह हा धार्मिक विधि आहे

आणि त्याशिवाय विवाह होऊंच शकत नाही असें ठरलें. याचा तरुणांना अेक फायदा असा मिळाला की आअीबापांची परवानगी नसली तरीदेखील धार्मिक विधि झाला म्हणजे लग्न झालें. यामुळें पाद्र्यांच्या साह्यानें अशीं चोरटीं लग्नें पुष्कळ होऊं लागलीं, अितकेंच नव्हे तर विवाहाशिवाय समागम हें भयंकर पाप आहे आणि विवाहाला परवानगी न दिल्यास तरुण माणसें हें पाप केल्याशिवाय राहणार नाहीत, या सबबीवर अशा चोरट्या लग्नांचें समर्थन पाद्र्यांकडून होऊं लागलें. तेव्हां अेकंदरींत आअीबापांच्या अधिकाराला जरी धर्माचा पाठिंबा होता, तरी या बाबतींत तरुणांना स्वातंत्र्य मिळालें.

मुसलमानांतही विवाहाचें अेक स्वरूप असें होतें की दोघांनीं काजी-समोर करार केला की धार्मिक विधि लागत नसे. हा करार ठराविक मुदतीचा असे, व कराराची मुदत संपल्यावर ती वाढवून घेतां येत असे. हा करार पुरुषानें मोडल्यास त्याला ठरलेली रकम स्त्रीला द्यावी लागत असे आणि स्त्रीनें मोडल्यास तिला चाळीस दिवसपर्यंत दुसरा करार करतां येत नसे.

मुंबईतील मरहूम जज्ज बद्रुद्दीन तयबजी यांनी लिहिलें आहे की अरब लोकांत अेक प्रकार असा असे की अरब स्त्रीला कोणत्याही पुरुषाला आपल्या तंबूंत घेतां येत असे आणि असें झाल्यास कोणाचाही कोणावर हक्क उत्पन्न होत नसे. त्याला तिनें पाहिजे तेव्हां घालवून द्यावा आणि मुलें झाल्यास त्यांच्यावर तिची मालकी असे.

पॅसिफिक महासागरांत दक्षिणेकडे फ्रान्सच्या मालकीचीं 'न्यू हेब्राअिड्स्' नांवाचीं बेटें आहेत, तेथील मजुरांमधें मुदतीच्या लग्नांची वहिवाट आहे. ही मुदत तीन वर्षांची असते आणि या लग्नाला वरच्या गोऱ्या अधिकाऱ्याची संमति लागते. वधूवरांची आपआपल्या घरीं अगोदर लग्नें झालेलीं असतातच, पण त्यांचा यांत संबंध नसतो. या सर्व बेटांत बायका कमी असल्यामुळें अेकेकीला अगोदरचे तीनचार नवरे असले, तरी त्या ठिकाणीं तिला नवरा नसतो आणि म्हणून ती आणखी अेक लग्न तीन वर्षांपुरतें करते, पण असें लग्न केल्यावर तिची किंवा त्याची कामाची मुदत संपलेली असली तरी

आणखी तीन वर्षें तेथेच रहावें लागतें.

हें सर्व जाऊन पाश्चात्यांच्या धार्मिक दृष्टीने लग्न म्हणजे अेक सार्वजनिक समारंभ आणि संस्था होऊन बसली आहे. अिंग्लंडांत कायदा कडक आहे, पण तरी देखील ज्यांना कांही कारणाने समारंभ नको असेल, ते स्कॉटलंडमधें 'ग्रेटना ग्रीन' नांवाच्या ठिकाणीं जाऊन कोणत्याही समारंभाशिवाय लग्न उरकून घेतात. अमेरिकेंतही कित्येक संस्थानांत लग्न हा शुद्ध करार असतो आणि त्याला कोणताही समारंभ लागत नाहीं.

जपानांतही तो करारच आहे. येथें वधूवरांना नोंदणीकरतां कचेरींत जावें लागत नाही. दोघांच्या संमतीने विवाह झाल्याचें रजिस्ट्रारला लिहून कळवलेलें चालतें आणि त्याचप्रमाणें दोघांच्या संमतीने लग्न मोडतांही येतें. सयाममधें अितकेंही करावें लागत नाही. दोन माणसें अेकत्र रहात असलीं म्हणजे संमति गृहीत धरतात आणि तें लग्न समजतात. अलीकडे मात्र नोंदणी पाहिजे असें बोललें जात आहे.

हिंदू आणि क्रिस्ती धर्मांनी विवाहविधीचा मोठा बाऊ केलेला आहे. कोणाला किती बायका आहेत, किंवा बायकांना किती नवरे आहेत, याची बौद्ध धर्माला पर्वा नसते, कारण हे सर्व प्रकार बौद्ध म्हणवणाऱ्या लोकांत सांपडतात. अेकंदरीने पाहतां विवाहसंस्थेचा अर्थ अितकाच होतो कीं विवाह-बाह्य समागमाच्या परिणामीं जर संतति झाली, तर ती अनौरस ठरवून अशा रीतीने लक्षावधि मुलांना समाजांत तिरस्काराने वागवण्यांत येतें. हा न्याय आहे काय? त्या बिचाऱ्यांची काय चूक असते, म्हणून त्यांना ही शिक्षा करावी? हा अन्याय ज्या विवाहसंस्थेमुळें होतो, ती कितपत अिष्ट समजावी याचा विचार ज्याचा त्याने करावा.

विवाहांतील अेकनिष्ठतेवर पुष्कळ लोक भर देतात, पण जेथें अनेक बायका किंवा अनेक नवरे असूं शकतात, तेथें अेकनिष्ठतेचा संबंध काय? शिवाय अेकनिष्ठतेचा अर्थ काय करावा हाही प्रश्न आहे. अेका कालीं परपुरुषाला किंवा परस्त्रीला स्पर्श करण्याने देखील अेकनिष्ठतेचा भंग होतो असें मानीत

असत. परंतु अलीकडे यूरोपांत प्रत्यक्ष समागमाशिवाय अेकनिष्ठतेचा भंग होत नाहीं. चुंबनाने देखील तो होत नाही असें अनेक स्त्रिया मानतात. अर्थात् ही पूर्ण कामस्वातंत्र्याच्या दिशेने प्रगति आहे.

अर्थात् अेकनिष्ठतेच्या कल्पनेमुळें व्यभिचार हा भयंकर गुन्हा ठरतो. हा गुन्हा मुख्यतः स्त्रियांचे बाबतींत विशेष भयंकर समजतात, कारण पुरुषाचा स्त्रीवर जितका मालकी हक्क असतो, तितका स्त्रीचा पुरुषावर असत नाही. याचाच अेक परिणाम म्हणजे पुरुषांना अनेक बायका करण्याची परवानगी सार्वत्रिक असे, पण स्त्रियांनी अनेक नवरे करण्याची चाल फारच थोड्या गटांत होती किंवा आहे. व्यभिचार हा गुन्हा मालकीहक्काविरुद्ध असल्यामुळें तो चोरीच्याच स्वरूपाचा आहे. अर्थात् याने त्याचें भयंकर स्वरूप कमी होत नाही, कारण अिंग्लंडांत पूर्वी चोरीला देखील फाशीची शिक्षा असे. तरीही कडक पहारा असलेल्या जनानखान्यांत देखील व्यभिचार होत नसे असें नाही. फाशीच्या शिक्षेने अिंग्लंडांतील चोरांनी चोरी सोडली नाही आणि व्यभिचार देखील शिक्षेच्या भयाने बंद होत नाही. नवऱ्याने बायकोला व्यभिचार करतांना पकडलें, आणि त्याने दोघांनाही ठार मारलें, तरी हल्ली देखील त्याला शिक्षा होत नाही, तो त्याचा हक्कच समजतात. बॅबिलोनचा राजा हम्मुराबी याच्या कायद्याने दोघांनाही अेकत्र बांधून नदींत फेकून देण्याची शिक्षा असे. कित्येक ठिकाणीं दोघांनाही जिवंत जाळीत असत, कित्येक ठिकाणीं स्त्रीचें नाक व पुरुषाचें लिंग कापून टाकण्याचा अधिकार नवऱ्याला असे.

कित्येक ठिकाणीं शिक्षा बरीच सौम्य असे. क्रिस्प नांवाच्या प्रवाशाने लिहिलें आहे की नासो बेटांत व्यभिचारी स्त्रीचे केस कापून टाकण्याचा अधिकार नवऱ्याला असे, पण तिच्या साथीदाराची मात्र सर्व मालमत्ता त्याला मिळत असे. कॅरोलीन बेटांत व्यभिचारी स्त्रीला नवरा कांही दिवस घरांत घेत नसे आणि तिच्या जाराला माराची धमकी दाखवून त्याच्याकडून पैसे उकळीत असे.

पण नवऱ्याच्या संमतीने जर स्त्री व्यभिचार करीत असेल, तर तिला शिक्षा नाही. कित्येक ठिकाणीं पाहुण्याचा सत्कार म्हणून बायकोला त्याच्याकडे पाठवण्याची चाल आहे. स्पार्टा येथें मुलें देखणीं व्हावीं म्हणून अेखादा देखणा पाहुणा आल्यास त्याच्याकडे बायकोला पाठवण्याची चाल होती आणि बायकांची याला हरकत नसे. पुष्कळ ठिकाणीं मोठ्या भावाच्या बायकोशीं धाकट्या भावाचा संबंध असतो. तिबेटमधील वरच्या दर्जाच्या लोकांत बायकांची अदलाबदल करण्याची चाल असे. प्रवाशांना बायका तात्पुरत्या उसन्या देऊन त्यांच्याकडून पैसे मिळवण्याचीही चाल कित्येक ठिकाणीं आढळते. नवऱ्याने बायकोच्या बहिणीशी संबंध ठेवण्याचीही चाल पुष्कळ ठिकाणीं असते.

याबद्दल असें म्हणतां येअील की या निरनिराळ्या गटांच्या निरनिराळ्या चालीरीती असतील, त्यांना कां महत्व द्यावें? परंतु असेच प्रकार पाश्चात्य देशांतही, नियमितपणें नव्हे, पण कधी कधी चालतात हें सर्वांना माहीत आहे. दोस्तोयेव्हस्की याने फ्रान्सबद्दल लिहिलें आहे की तेथें पतिपत्नी दोघेंही अेकमेकांना व्यभिचाराची जवळजवळ परवानगीच देतात. चेंगिझखानाने अेक प्रांत जिंकल्यावर तेथें कायद्याने व्यभिचाराला बंदी केली, तेव्हां तेथील लोकांनी ओरड केली की पाहुण्यांना बायका उसन्या देण्याची आमची परंपरा आहे, तेव्हां चेंगिझखानाने त्यांना अनैतिक म्हटलें, पण परवानगी दिली.

बायकांच्या व्यभिचारावर पैसे मिळवणें आधुनिकांना पटत नाही, पण बढती मिळवण्याकरतां बायकांचा असा उपयोग करणारे पुष्कळ असतात. पण यांत फरक काय आहे? हें निव्वळ ढोंग आहे. कित्येक वेळां अेकसारखीं युद्धें चालल्यामुळें लोकसंख्या कमी झाली, म्हणून युद्धावर गेलेल्या योद्ध्यांच्या बायकांना व्यभिचाराची परवानगीच नव्हे, तर सक्ती कायद्याने केल्याचीं उदाहरणें आहेत आणि अशीं झालेलीं मुलें कायद्याने औरस ठरवलीं आहेत.

या सर्व विवेचनाचा निष्कर्ष असा निघतो की व्यभिचारापासून वास्तविक नुकसान असें कांहीच होत नसून फक्त नवऱ्याच्या मालकीहक्काला

धक्का पोंचतो, हीच खरी तक्रार असते. अेखादी वस्तु अेखाद्याने चोरली तर तो आपण गुन्हा समजतों, पण तीच वस्तु आपण अेखाद्याला उसनी दिली तरी आपल्याला कांही वाटत नाही. म्हणजे परवानगीने जर अेखाद्या वस्तूचा दुसऱ्याने उपयोग केला तर आपण तो गुन्हा समजत नाही. तशीच गोष्ट व्यभिचाराची आहे असें वरील निरनिराळ्या चालींवरून दिसतें. म्हणजे व्यभिचार हा केवळ सांकेतिक गुन्हा आहे. अेखाद्या देशांत कायद्याने किंवा चालीरीतींमुळें जरी तो अपराध मानला असला, तरी त्याने खरें नुकसान होत नाही हें उघड आहे.

---

# प्राचीन भारतांतील कांही विकृत लैंगिक आचार

लेखिका, **दुर्गा भागवत.**

**कामवासनेबद्दलची दृष्टि.** प्राचीन भारतीयांची कामवासनेबद्दलची दृष्टि उदार, प्रांजल आणि अगदीं स्वाभाविक वाटावी अशी आहे. लैंगिक अवयवांबद्दल घृणा त्यांना अपरिचित होती. भिन्नलिंगीयांमधलें आकर्षण त्यांना हृद्य वाटे. अितकें कीं महाभारतांत तर ठिकठिकाणीं ऋषींनीं तिर्यग्योनींतल्या स्त्रियांशीं आनंदानें संसार केलेले दिसून येतात. कश्यप ऋषि देवदानवांचे निर्माते. त्यांच्या स्त्रिया सर्व योनींतल्या होत्या, पक्षिणी, नागिणी, मानवी, पाशवी, वगैरे. आणि कश्यप मुनीचा हा गोतावळा महाभारतांत अितक्या स्वाभाविक रीतीने वर्णन केला आहे की त्यांत वाचणाराला अजूनही विकृत मनोवृत्तीचा वास येत नाही. जणूं कश्यपाच्या स्त्रिया मानवीच होत्या असें आपल्याला वाटतें. गरीब बिचाऱ्या हरिणी तर नित्य तापसांना सुख व प्रजा द्यायच्या. प्रारंभापासूनच प्रजादायक भिन्नयोनिसंबंध हा अशा तऱ्हेने अनैसर्गिक संबंध नसल्यासारखाच वेदकालापासून भारतीयांनी ( मिसरी, बाबिलोनिअन व ग्रीक लोकांप्रमाणेंच ) कांही विभूतींच्या संबंधी मानला.

## प्राचीन भारतांतील कांही विकृत लैंगिक आचार

स्त्रीपुरुषांतल्या प्रेमाकर्षणाला तर मग या स्थितींत अधिकच महत्त्व आल्यास नवल काय? तारुण्याने मानवाला दिलेली परमोच्च देणगी म्हणजेच कामसफलता. कामभावनेचा दुरुपयोग त्याने करूं नये, कामभावनेचें उद्दीपन क्षणिक असूं नये, तर तें अेक अक्षय टिकणारें मोहन व्हावें, म्हणून वेगवेगळ्या विचारवंतांनी वेगवेगळ्या पद्धतींनी आपले विचार संस्कृत वाङ्मयांत मांडले आहेत. आमचीं महाभारत–भागवतासारखीं पुराणें, काव्यें, नाटकें, सारीं शृंगाराने भरलेलीं आहेत. पतिपत्नींतलें कायमचें प्रेम तर त्यांनी निरतिशय गौरविलें आहे. वात्स्यायनाचें कामसूत्र तर प्रेमाची कला कशी संपादन करावी याचें शास्त्रशुद्ध (अर्थात् ती त्या काळची शास्त्रशुद्धता आहे) दिग्दर्शन करतें. वात्स्यायनप्रभृति भारतीयांची ग्रीक वगैरेशीं तुलना करतांना आपलें वाङ्मय अधिक प्रगल्भ व उन्नत वाटतें. प्रेमसंबंधांत भारतीय विचारवंतांनीं व कामसूत्रकारांनी स्त्रीबद्दल दाखवलेली हळुवार गौरवात्मक भावना–स्त्रीला फुलाने सुद्धां मारूं नका, या शब्दांनी व्यक्त झालेली–हॅवलॉक अेलिसनें प्राचीन भारतीयांचा अपूर्व विशेष म्हणून वाखाणली आहे. (सायकॉलजी ऑफ् सेक्स, भाग ४, पृ. ५४५).

**आद्य ग्रंथ.** भारतीयांचे आद्य ग्रंथ जे वेद, त्यांत स्त्रीपुरुषांतल्या प्रेमाचा जरी यथोचित गौरव केला असला, तरीं जें प्रेम प्रजोद्भव करीत नाही, त्याला गौण लेखलें आहे. किंबहुना संततीची प्रबळ लालसा कामभावनेला सतत प्रोत्साहन देत असली, तरी उदात्त प्रेमभावना या वाङ्मयांत फारच अल्प प्रमाणांत दिसून येते. शंभर पुत्रांनीं गजबजलेलें घर, हेंच वैदिक आर्यांचें मुख्य सुखस्वप्न असे. त्यामुळें ऋग्वेदांत व यजुर्वेदांत कामवासना कुटुंबस्थैर्यासाठीं मर्यादित केलेली दिसते. अथर्ववेदांत मात्र मोहिनीमंत्रांना अैसपैस जागा दिलेली आढळते. कामवासनेचें नाना प्रकारचें उद्दीपित स्वरूप या वेदांत आढळून येतें, तसें अितर ठिकाणीं क्वचितच आढळतें. वश नसलेल्या पुरुषाला किंवा स्त्रीला वश करण्याचे ते सारे विधि आहेत, प्रतिस्पर्ध्याला हतबल करण्याचे ते उपाय आहेत. गार्हस्थ्य या वाङ्मयांत क्वचितच दिसतें.

**स्मृति.** गृह्यसूत्रें व स्मृति यांत ऋग्वेदाचाच गार्हस्थ्याचा कित्ता पुढें ठेवून कुटुंबवत्सलतेचा आदर्श समोर ठेवला आहे....‘ कामे च नातिचरामि ’ हें ध्येय डोळ्यांपुढें वागवलें आहे. स्मृतींत स्त्रीला प्रजोद्भवाचें साधनच गणलें आहे. अर्थात् तेथें विवाहांत देखील मोकळें प्रेम गौणच आहे, मग अितर प्रेमाची गोष्टच कशाला हवी ! सारांश काय, कामवासनेला श्रुतिस्मृतींत जखडून टाकल्याने लैंगिक जीवनाचें समग्र दर्शन त्या वाङ्मयांत होत नाही. जें स्वैराचाराचें चित्र आहे, तेंही स्त्रीपुरुषांच्याच लैंगिक संबंधाचें, दुसरें नाहीं. आणि म्हणूनच काम म्हणजे स्त्रीपुरुषांतलें आकर्षण व रति म्हणजे स्त्रीपुरुषांचा संभोग, हाच अेक ठाम अर्थ या शब्दांना आलेला आहे. ग्रीक, रोमन व मिसरी लोक समसंभोग हा अेक नैसर्गिक संभोगाचा प्रकार समजंत, त्याचा गौरव करीत. दोन पुरुषांतलें किंवा स्त्रियांतलें सकाम प्रेम, ही उच्च भावनाच समजत. पण भारतांत तसें नव्हतें. समलिंगीयांच्या संभोगाचें अेकही चित्र भारतीय वाङ्मयांत नाही. त्रोटक उल्लेख आहेत, पण अशा संबंधांना अनैतिक व पापमय म्हणून त्यांचा तीव्र निषेधच केला आहे. अनैसर्गिक संभोगांत स्वसंभोग किंवा हस्तमैथुन व स्त्रियांबरोबर सरळ संभोग न करतां अन्य तऱ्हेने केलेल्या विपरीत रतिक्रीडा, यांचाच प्रामुख्याने उल्लेख येतो. संस्कृत अभिजात साहित्यांत म्हणजे काव्य, कथा किंवा नाटक, यांत तर असा उल्लेखही सांपडत नाही. अितकेंच नव्हे तर रामायण, महाभारत व पुराणें यांतही अशीं उदाहरणें नाहींत. जे उल्लेख आहेत ते अत्यंत त्रोटक आहेत. उदा० महाभारतांत ( १३, १४५–५२ ) आंधळे, दुराचारी आणि खुळे लोक नको त्या योनीशीं संबंध ठेवतात ( वियोनौ ) विशेषतः पशूंशीं. याच श्लोकाच्या उत्तरार्धांत ‘ वियोनि ’ म्हणजे खालच्या जातीच्या स्त्रीशीं संबंध ठेवण्यांतही हे लोक आनंद मानतात असें म्हटलें आहे. ‘ वियोनि ’ या शब्दाचा अर्थ मेयर यांनीं ‘ द सेक्शुअल लाअिफ् अिन् अेन्शंट् अिंडिआ ’ या ग्रंथांत ( भाग १, पृ. २४२ ) पुरुषांमधला समसंभोग असा घेतला आहे. दोन स्त्रियांच्या संभोगाचा उल्लेख युधिष्ठिर व नारद यांच्या संवादांत महा-

भारतांत आलेला आहे ( १३, ३८–४३ ). नीलकंठाने महाभारतांतल्या या उल्लेखावर भाष्य करतांना असें म्हटलें आहे की अशा तऱ्हेचे प्रयोग ज्यांचे नवरे परगांवीं गेलेले असत अशा सुवासिनीच अितरांपेक्षां अधिक करीत, अेवढेंच नाही तर कृत्रिम लिंगांच्या साहाय्याने अशा स्त्रिया अेकमेकींशीं रतिक्रीडा करीत. याहून अधिक माहिती या प्रकारांसंबंधीं मिळत नाहीं.

स्मृतिकारांनी समसंभोग करणाऱ्या व अनैसर्गिक रतिक्रीडा करणाऱ्या पुरुषाला वाळींत टाकावें म्हणून सांगितलें आहे ( मनुस्मृति ११, ६७, १७५; विष्णुपुराण १, अध्याय ३, ७ ). याशिवाय मनूनें स्त्रियांमधल्या संबंधाचा तीव्र निषेध केला असून असें करणाऱ्या स्त्रियांचीं दोन बोटें कापावीं आणि त्यांचें मुंडन करावें असें सांगितलें आहे. मुलींनी असें केल्यास त्यांना चाबकाचे दहा फटके मारावे असें म्हटलें आहे ( ७, ३६९–७०; ११, ६१ ). कौटिल्याने स्त्रीशीं योनीखेरीज अितर ठिकाणीं संभोग केल्यास ( स्त्रियं वियोनौ गच्छतः ) कडक शासन करावें असें म्हटलें आहे. ( कौटिलीय अर्थशास्त्र. १९१९, पृ. २४२ ). त्याचप्रमाणें पशुसंभोग व देवळांतल्या प्रतिमांशीं केलेला शृंगार, यांनाही कौटिल्याने मोठा दंड सांगितला आहे ( पृ. २३६ )

**वैद्यकीय ग्रंथ.** वैद्यकीय ग्रंथांत देखील हा विषय टाळलेलाच दिसतो. त्यासंबंधीं अगदींच त्रोटक उल्लेख चरक व सुश्रुतांत आढळतात, अनैसर्गिक संभोग करूं नये, अेवढेंच काय तें चरकांत म्हटलेलें आढळतें ( चरकसंहितेचें अविनाशचंद्र कविरत्न यांनी केलेलें अिंग्रजी भाषांतर, पृ. ९७ ) सुश्रुतांत अेक पायरी पुढें जाऊन म्हटलें आहे की दोन स्त्रियांनी संभोग केला तर जो गर्भ राहतो, तो बिनहाडांचा असतो, केवळ मांसमय असतो ( निर्णयसागर प्रत, १९३१, पृ. २९४ ). अर्थात् हें विधान आतांच्या वैद्यकशास्त्राशीं पूर्णपणें विसंगत असेंच आहे यांत शंका नाही, पण केवळ शास्त्रीय दृष्टीने अशी चिकित्सा करणाराला हा अेकच उल्लेख आहे हें विसरतां येत नाही. अर्थात् हें सर्व तंत्र लक्षांत घेतल्यास असे संभोग तर काय, परंतु ग्रीकांच्या

नार्सिसस्प्रमाणें स्वसंभोगाचें स्वरूप देखील भारतांत प्रतिष्ठा पावूं शकलें नाही. सुश्रुतांत स्वसंभोग हें नपुंसकत्वाचें लक्षण म्हणून म्हटलें आहे. ( पृ. २९३ )

**पाली वाङ्मयांतले उल्लेख.** भारतीय बौद्धधर्म हा सर्वस्वी श्रवण-धर्म असून बुद्धभिक्षु व भिक्षुणी मठांत रहात, ही परिस्थिति लक्षांत घेतल्यास सक्तीचें ब्रह्मचर्य व त्याचे दुष्परिणाम यांचें यथार्थ चित्र अशा ठिकाणीं पहायला मिळालें तर कांही नवल नव्हे. विनयपिटकांत भिक्षुभिक्षुणींनी केलेल्या शेंकडों लैंगिक व्यवहारांचीं चर्चा आलेली आहे. स्त्रीपुरुषांतला संभोग, समसंभोग, प्रेतसंभोग, स्वसंभोग, व नाना तऱ्हेचे विपरीत प्रकार त्यांत वर्णन करून त्यांचा कडक निषेध केलेला आहे. या सर्व गुन्ह्यांची वर्गवारी बौद्ध धर्मगुरूंनी फार व्यवस्थित केलेली असून त्यांत त्यांचें कायद्याचें ज्ञान उत्तम तऱ्हेने प्रत्ययास येतें. या प्रकारांचें वर्णन मीं ' अर्ली बुद्धिस्ट जुरिसप्रूडन्स ' या माझ्या प्रबंधांत सविस्तर केलें असल्याने तें फिरून येथें देत नाही. सारांशानेंच सांगायचें म्हणजे विषमसंभोगाचीं तीन अंगें आहेत. १. हिजड्याशीं केलेला संभोग ( ओल्डेनबर्गनीं संपादिलेलें विनयपिटक, भाग ३, पृ. ३०–३१ अित्यादि ) २. पशूंशीं, म्हणजे माकडिणींशीं वगैरे केलेली रतिक्रीडा ( पृ. २२–२३ ). त्याचप्रमाणें यक्षकिन्नरांशीं म्हणजे अतिमानुष स्त्रियांशीं केलेला संभोग ( पृ. २७–३० ). ३. स्त्रीपुरुषांच्या किंवा जनावरांच्या प्रेताशीं केलाला संभोग, मग तें प्रेत ताजें असो, कुजलेलें असो, किंवा अेखादा अवयवच असो.

या गुन्ह्यांच्या उगमाचा अितिहास मनोरंजक आहे. अेकदा अेका भिक्षूचें अेका स्त्रीवर मन जडलें, पण त्याने तिला आपलें मनोगत सांगण्यापूर्वीच ती स्त्री मेली. तिच्या मृत्यूची वार्ता अैकून तो तरुण भिक्षु विचलित झाला, दुःखी झाला. मागचा पुढचा कांही विचार न करतां तो स्मशानांत गेला. तेथें तिचें शरीर तरी आपल्याला मिळेल असें त्याला वाटलें, कारण त्या काळीं प्रेतें टाकून देण्याची वहिवाट मोडली नव्हती. पण पाहतो तों तिचें दहन झालें होतें. हाडांची रास काय ती उरली होती. तीं हाडें

जुळवून त्यांच्याशीं संभोग करण्याचा त्यानें प्रयत्न केला. दुसरेही भिक्षु स्त्रियांच्या प्रेतांशीं संभोग करीत. स्त्री नच मिळाली तर पुरुष किंवा मृत जनावरही त्यांना चाले. पुष्कळदां सडलेल्या प्रेताशींही ते संबंध ठेवीत. स्मशानें गांवापासून दूर असल्याने हे प्रकार लवकर उघडकीस येत नसत. अशा गुन्ह्यांबद्दल त्या भिक्षूला संघांतून कांही काळ वाळींत टाकीत व प्रायश्चित्तानंतर परत घेत. पण स्त्रीच्या बाबतींत मात्र तिचा कमरेपासून खालचा कोणताही भाग हिजडा, पशु, यक्षपिशाच, किंवा प्रेत, यांच्या सांनिध्यांत आल्यास तिला संघांतून कायमची व तत्काळ घालवून देत. ( पृ. २९–३३ )

**समसंभोग**. पुरुषांत समसंभोगाचे प्रकार नेहमीं चालत. अेखाद्या पुरुषाने दुसऱ्याचें चुंबन घेतलें तरी तो गुन्हा समजला जाअी. कामशांतीकरतां भिक्षु अेकमेकांच्या पाठीवर चढत, तोही गुन्हा समजला जाअी. ( विनयपिटक, भाग ३, पृ. ३०–३३, सामंतपसादिका, पी. टी. अेस्., भाग १, पृ. २६६ ) स्त्रियांतही दोन बायकांना अेका शय्येवर निजूं देत नसत. भिक्षुणीसंघांत स्त्रिया कमलपत्राच्या किंवा उत्पलपत्र नांवाच्या कृत्रिम तंत्राच्या साहाय्याने अेकमेकींस कामसुख देत असें आढळून येअी ( सामंतपसादिका, पृ. २६६ ).

**स्वसंभोग**. हस्तमैथुनाचा प्रयोग अितर प्रयोगांपेक्षां अधिक सुलभ व तो फार मोठ्या प्रमाणांत होत असल्याचें आढळून येअी. हस्तमैथुन, अेकमेकांचीं अिंद्रियें चोखणें, उष्ण पाण्यांत वीर्यपात करणें, वगैरे प्रकार नेहमी चालत. बरें नसल्याची बतावणी करून मोऱ्या, संडास, मुत्र्या वगैरे ठिकाणीं असे प्रयोग भिक्षु करीत. कृत्रिम साधनें म्हणून स्त्रीपुरुषांच्या लांकडांच्या प्रतिमांचा उपयोग भिक्षु करीत ( सामंतपसादिका, भाग १, पृ. २६७ ). अशा तऱ्हेचा स्वसंभोग स्त्रियांतही चाले. त्या जतुमत्थक नांवाचें उपकरण वापरीत. नांवावरून तें लाखेचें असावेंसें वाटतें. मत्थक म्हणजे रवीसारखें घुसळतां येण्याजोगें असावें असेंही वाटतें. परंतु नीलकंठानें वर्णन केलेल्या कृत्रिम लिंगाप्रमाणें तें होतें, की जपानी ‘ डिल्डो ’ प्रमाणें होतें, तें जाणण्या-

अितका पुरावा उपलब्ध नाही. हें उपकरण संघांत कसें शिरलें, ती अेक मनोरंजक कथा आहे. अेक तरुण मुलगी दीक्षा घेऊन संघांत नुकतीच आली होती. तिची कामवासना अनावर झाल्यामुळें ती अेका पूर्वी राणी असलेल्या वडिलधाऱ्या भिक्षुणीकडे आली व तिला म्हटलें, ‘ मला मन आवरत नाही. तुमचा पति दूर गेला असतां तुम्ही काय करीत असा ? ’ पूर्वकालीन राणी म्हणाली, ‘ अंतःपुरांत पुष्कळ बायका असायच्या आणि नवरा तर अेकटाच. यामुळें पुष्कळ बायकांना अेकांतांतच रात्रीच्या रात्री काढाव्या लागत. पंधरवड्यांत अेक दिवस माझी पतीशीं गांठ पडे. अर्थात् जतुमत्थक वापरण्यावांचून आम्हाला गत्यंतर नव्हतें ’ ( विनयपिटक, भाग ४, पृ. २६१ ). मासिक पाळीचें सोंग करून गुह्यभाग धुतांनाही स्त्रिया आपला हात योनिमार्गांत घालीत. ( विनयपिटक, भाग ४, पृ. २६२–६३ )

**खच्ची करणें**. कांही भिक्षु हा कामवासनेचा त्रास नको म्हणून अिंद्रिय कापून टाकीत किंवा निर्वीर्य करीत. हाही गुन्हा समजला जात असे. ( चुल्लवग्ग ५, ७ )

---

# पत्रव्यवहार

१

( सारांश ) गेले कांही दिवस येथील महाराष्ट्रमंडळांत ज्ञानसत्र ( ब्रेन्स ट्रस्ट ) चा कार्यक्रम होतो. खालीलपैकीं कांहीं प्रश्न त्या कार्यक्रमाच्या व्यवस्थापकांना विचारण्यासाठीं देण्यांत आले होते, पण अश्लील वाटल्यामुळें विचारण्यांत आले नाहीत. त्याचप्रमाणें अेकदां रांगणेकरांच्या ‘ वहिनी ’ या नाटकांत अेक वाक्य, ‘ पोरीला ओकाऱ्या होऊं लागल्या, ’ असें असल्यामुळें तें प्रयोगास अयोग्य ठरवण्यांत आलें. कांही सज्जनांना अेखाद्या मुलीचें लग्न झालें, किंवा अमुक स्त्री प्रसूत झाली, हीं वाक्यें सुद्धां अश्लील वाटतात. कांहींच्या म्हणण्याप्रमाणें ज्या विषयाची चर्चा चालू असतां सभ्य ( ? )

स्त्रियांना माना खालीं घालाव्या लागतात, ते विषय अश्लील. तेव्हां त्यांच्या मताप्रमाणे डॉ. मेरी स्टोप्स किंवा आपल्या शकुंतलाबाओी परांजपे यांना असभ्य म्हणावें लागेल. असो, आपणास खालील प्रश्न किंवा त्यांचीं उत्तरें अश्लील वाटत नसल्यास मासिकांत स्थान द्याल अशी आहे. १. स्त्रियांना प्रसूतिपूर्व आणि नंतर कांही महिने ऋतुस्राव होत नाही याचें कारण काय? गर्भपोषण किंवा दूध निर्मितीकरतां त्याचा उपयोग होतो काय? २. प्रसूती-पूर्वी किंवा नंतर विटाळ जात नाही, तेव्हां स्त्रीबीज नेहमीप्रमाणें पक्व होऊन बाहेर पडत नाही असें समजावें काय? ३. सुरक्षित काल असा कांही काल सिद्ध झाला आहे काय? विटाळशीपणीं गर्भधारणा अशक्य आहे काय? ४. गर्भधारणेनंतर नक्की प्रसूतिकाल कसा ठरवावा? गर्भधारणेचा काल २८० दिवसांचा असतो की केव्हां अधिकही असूं शकतो? ५. गांधींच्या मुळें देशाची प्रगति झाली का अधोगति? ६. खग्रास सूर्यग्रहणाचे वेळीं जे फोटो घेतले, ते सूर्याचे का चंद्राचे? अंधारांत फोटो कसे घेतां आले? ७. संभोगा-नंतर कुत्राकुत्रींना वेगळें कां होतां येत नाही? मांसाहारी प्राण्यांचें असें होतें म्हणतात, हें खरें आहे काय? ८. मासिक स्राव फक्त माणसांत आढळतो की अितर प्राण्यांतही असतो? **वामन साने**, जमशेदपूर.

उ. आमच्या मासिकाच्या प्रत्येक अंकांत सुरवातीला जें वाक्य असतें, त्यावरून आम्हाला कांहीही अश्लील वाटत नाही हें स्पष्ट होईल. १. स्त्रियांचा ऋतुस्राव हा बीजकोशांच्या अेक प्रकारच्या अंतःस्रावाचा परिणाम आहे. गर्भधारणेच्या कालांत हा विशिष्ट स्राव बंद असतो म्हणून ऋतुस्राव होत नाही. प्रसूतीनंतर अशक्ततेमुळें किंवा अंगांत रक्त पुरेसें नसल्यामुळें बंद राहतो, पण तसा नियम नाही, कारण कित्येक स्त्रियांना प्रसूतीनंतर पुढच्याच महि-न्यांत गर्भ राहतो. २. प्रसूतीपूर्वी बीजाची उत्पत्ति बंद असते, पण नंतर मात्र बंद राहतेच असा नियम नाही. ३. सुरक्षित काल असा महिन्यांतील अेकही दिवस नसतो. स्रावाच्या दिवसांतही गर्भधारणा झाल्याचीं उदाहरणें आहेत. ४. स्थूल मानाने मासिक स्रावांमधील अंतर २८ दिवसांचें असतें

असें धरून, असे १० महिने धरून २८० दिवस ठरवलेले आहेत, परंतु कित्येकांचा हा काल कमी किंवा जास्तही असतो, यामुळें सर्वांनाच हा आंकडा लागू पडत नाही. त्याचा हिशोब असा की गर्भधारणेपूर्वी जेव्हां शेवटचा मासिक स्राव झाला असेल, तो संपल्यापासून दहा स्रावांचा काल मोजावा, म्हणजे प्रसूतीकाल समजतो. ५. गांधींच्या मुळें लोक अधिक निर्भयपणें वागूं लागले, तुरुंगवासाला भीत नाहीसे झाले हें खरें, परंतु अेकंदरींत त्यांच्या धार्मिक ढंगांमुळें कित्येक लोकांची विचारशक्तिच नाहीशी झाली, ते वास्तविक कोणत्याही विषयांत तज्ञ नसतांना त्यांना सर्वच विषयांत तज्ञ समजण्याची कित्येकांना संवय लागली, उपोषणाचें आततायी तंत्र राजकारणांत शिरून पुष्कळ लोक त्याचा सर्रास दुरुपयोग करूं लागले, उदाहरणार्थ बुद्धिवादी म्हणवणारे समाजवादी सुद्धां उपोषणाचें तंत्र वापरूं लागले, ही आमच्या मतें अधोगति आहे. स्वातंत्र्य गांधींमुळें मिळालें नाही, जागतिक परिस्थितीमुळें अिंग्रजांना येथें राहणें अशक्य झाल्यामुळें मिळालें, पण तें आमच्यामुळें मिळालें म्हणून कांग्रेसवाले त्याचा फायदा घेत आहेत. ६. खग्रास सूर्यग्रहणाचे वेळीं अर्थातच जो काळा दिसतो तो चंद्रच असतो, पण सूर्यबिंबाच्या भोंवतीं जो उजेड फांकलेला असतो, तो चंद्राने झांकला जात नाही, यामुळें फोटो काढतां येतो आणि हा उजेड फोटोंत दिसतो. ७. कुत्र्याचे अिंद्रियांत अेक हाड असतें, यामुळें त्याचें अिंद्रिय लवकर शिथिल न होतां आंतच अडकून बसतें. सर्वच मांसाहारी प्राण्यांचें असें होत नाहीं. मांजराचें असें होतेसें दिसत नाहीं. ८. मासिक स्राव कांही वानरांतही आढळतो, अितर प्राण्यांत आढळल्याचें माहीत नाहीं. **सं.**

२

(सारांश) १. संततिनियमनाच्या ज्या साधनांचा आपण पुरस्कार करतां, तीं बाहेरूनच येतात का ? येथें तयार करणें शक्य नाही का ? तीं देशांतच तयार झाल्यास स्वस्त पडून शिवाय पैसा देशाबाहेर जाणार नाही. शकुंतलाबाअी चिंध्यांचा जो प्रचार करतात, तो धोक्याचा आहे असें आपणास वाटत

नाही काय ? 'रिदम' पद्धतीअितकाच ? २. आपल्या 'संततिनियमन' पुस्तकाच्या किती प्रती खपल्या ? आणि 'कामशास्त्राच्या ?' यावरून महाराष्ट्र किती जागृत झाला आहे याची कल्पना येअील. मासिकाचे किती ग्राहक आहेत ? ३. 'मस्ती,' 'उन्माद' सारख्या मासिकांसंबंधी आपलें काय मत आहे ? या मासिकांचा जो खप होतो व रहस्यकथांचा जो सुळसुळाट झाला आहे, हें अभिरुचि थिल्लर झाल्याचें लक्षण नव्हे का ? चांगलीं मासिकें व पुस्तकें खपत नाहीत, त्याला काय करावें ? सरकारचें कर्तव्य कोणतें ? ४. सिनेमा-संगीतासंबंधी डॉ. केसकरांनी जें म्हटलें आहे त्यावर आपलें काय म्हणणें आहे ? रवींद्र-संगीतावर आपलें काय मत आहे ?...

उ. साधनें देशांत तयार करणें शक्य आहे, परंतु तिकडे लक्ष द्यायला कारखानदारांना फुरसत नाही. त्यांना पैसा मिळवायचा असतो, तो रबरी पिशव्यांनी व खेळण्यांनी मिळतो. तेल-चिंधीची पद्धत शकुंतलाबाअींनी शेंकडों बायकांना सांगितलेली आहे आणि ती पेसरी व जेलीच्या पद्धती-अितकीच यशस्वी आहे असा त्यांचा अनुभव आहे. 'रिदम पद्धति' अगदींच फोल आहे, तशी ही नाही. २. प्रत्येक पुस्तकाच्या १०००० च्या वर प्रती खपल्या आहेत. मासिकाचे ग्राहक फारच थोडे, सातशेंच्या आंत आहेत. ३. या मासिकांचा खप त्यांतील चित्रांमुळें व कामुकतेमुळें होतो. त्यांना आम्ही अश्लील म्हणत नाही, परंतु त्यांतील माहिती पुष्कळ वेळां चुकीची असते. रहस्यकथा लोकांना आवडतात, याला कोणाचा अिलाज नाही. सर्व जगभर त्यांचा खप मोठा आहे. त्यांत सरकारला कांही करतां येणार नाही. ४. सर्वच सिनेमासंगीत वाअीट असतें असें नाही, उदाहरणार्थ 'रामराज्य' वगैरे कांही पटांचें संगीत उत्कृष्ट आहे. बंगाली निर्मात्यांनी हिंदुस्थानी संगीतांत यूरोपीय संगीताची भेसळ करून संगीताचा नाश केला आहे आणि त्यांचेंच अनुकरण पुष्कळांनी केलें आहे. आमचे मतें यूरोपीय संगीत हें संगीत नसून गोंगाट आहे. निदान तें अितकें भिन्न आहे की त्याचा हिंदुस्थानी संगीताशीं

मिलाफ होणें अशक्य आहे. रवींद्रसंगीत हा प्रकार आम्ही अैकला नाही, परंतु नांवावरून तो बंगालीच असावा, म्हणजे गोंधळच असावासें वाटतें. सं.

---

# शारदेचें पत्र

सरकारचा आधाशीपणा अेकसारखा वाढत चालला आहे आणि तो कोठें थांबणार हें कळत नाही. आपले मंत्री न लाजतां किती खोटें बोलूं शकतात, याचा पुरावा डॉ. जीवराज मेहतांनी नुकताच दिला. चहा आणि साखर या चैनीच्या वस्तु आहेत असें म्हणण्याचें धाष्टर्य त्यांच्या पूर्वी कोणीं केलें असेल असें वाटत नाही. या वस्तु न मिळाल्याने कोणी मरत नाही हें खरें, तेव्हां त्या जीवनाला आवश्यक नाहीत असें म्हणतां आलें असतें, पण तेवढ्याने त्यांचें समाधान कसें व्हावें ? मुंबई सरकारच्या नऊ मंत्र्यांपैकीं दोघे चहा पीत नाहीत, हा त्यांना आपल्या विधानाचा पुरावा वाटतो. पण राजकारणाचा आणि तर्कशास्त्राचा संबंध काय, आणि सत्ताधारी लोकांना पुराव्याची गरज कां भासावी ! आमचें हुकमी बहुमत आहे, आम्ही वाटेल तें करणार, असें सरळ म्हणायला काय हरकत आहे ? पण या बाबतींत कांग्रेसवाल्यांचीं मतें देखील विरुद्ध आहेत, तेव्हां त्यांच्याकरतां या थापा असाव्यात. त्यांनी हें प्रकरण नेहरूंपर्यंत पोंचवलें आहे. हा बहुमुखी विक्रीकर सर्वांना भरडून काढणारा आहे, हें डोळे झांकून झोंपेचें ढोंग करणारांना दिसणार नाही, पण अितरांना स्पष्ट दिसतें.

परवां टिळक-पुण्यतिथीच्या दिवशीं महाराष्ट्र उत्कर्ष मंडळाचे अध्यक्ष काकासाहेब सप्रे यांनी गोवा प्रांत महाराष्ट्राचाच भाग असल्यामुळें तो पॉर्त्युगीज सरकारकडून हिसकून घेणें, निदान या बाबतींत गोव्याच्या लोकांना मदत करणें, आपलें पहिलें कर्तव्य आहे असें सांगितलें. हें ठीक आहे, परंतु आपल्याला काय करतां येण्यासारखें आहे आणि काय नाही, याचें तारतम्य ओळखणें हा टिळकांचा अेक मोठा गुण होता, असें

म. म. पोतदारांनी अध्यक्षपदावरून सांगितलें आणि तें खरेंच आहे. हिंदुस्थानांतले आपण व्यापलेले प्रांत आतां हिंदुस्थानला परत देण्याची वेळ आली आहे, हें ओळखून ते देण्याची अिच्छा फ्रेंच सरकारने निदान बोलून तरी दाखवली आहे, परंतु पॉर्त्युगीझ सरकार अधिक आडमुठें आहे, त्यांना हें उमजलें नाहीं. या बाबतींत काय करावें हा प्रश्न भारतसरकारचा आहे. कदाचित् तो युद्ध केल्याशिवाय सुटणारही नाही, परंतु तें करण्याची वेळ आली आहे की काय, हें महाराष्ट्राला ठरवितां येणार नाही, कारण या दृष्टीने महाराष्ट्र स्वतंत्र नाही आणि शिवाय तो असता तरी आपल्याला पॉर्त्युगालशीं युद्ध करण्याची ताकत आहे की काय, हा प्रश्न होताच. परंतु या बाबतींत हल्ली युद्ध तरी प्रत्यक्ष कांही करतां येण्यासारखें नाही हें ओळखलें पाहिजे.

वा. म. जोशांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने यंदा प्राचार्य सुलभा पणंदीकर यांचीं 'कथावाङ्मय आणि मानसशास्त्र' या विषयावर तीन व्याख्यानें झालीं. त्यांना मानसशास्त्रांतल्या तज्ज्ञ समजतात आणि त्यांना केंब्रिजची पदवीही आहे, तेव्हां मला त्यांच्या चुका काढण्याचा अधिकार नाही. तरीपण त्यांनी आपल्या व्याख्यानांत सौंदर्यशास्त्र आणि कलास्वरूपशास्त्र यांचा बऱ्याच वेळां उल्लेख केला, तो मात्र मला चमत्कारिक वाटतो. सौंदर्याची व्याख्याच कोणी करूं शकत नाही, कारण ही मतभेदाची बाब आहे. मला जें सुंदर दिसेल तें अितरांना दिसेलच असें नाही आणि असाच सर्वांचा अनुभव आहे. तेव्हां सौंदर्याची व्याख्या कशी करणार? कलास्वरूपाचें शास्त्र देखील त्याच प्रकारचें आहे, किंवा हीं दोन्ही अेकच आहेत असें म्हणतां येअील. तीं शास्त्रेंच नव्हत, कारण ज्याची व्याख्याच नाही त्याचें शास्त्र कसें बनवतां येअील? पिकॅसोसारख्या चित्रकारांनी काढलेल्या चित्रांत काय सौंदर्य असतें व काय कला असते, असा प्रश्न माझ्याच मनांत नव्हे तर इतर चित्रकारांच्याही मनांत येतो असें मी पाहिलें आहे. तेव्हां निदान त्यांत तज्ज्ञांचाही मतभेद असतो हें मान्य केलेंच पाहिजे. हीं नवीन शास्त्रें मान्य करायला मी तरी तयार नाही, मग मला कोणी अज्ञ म्हटलें तरी चालेल. मलाही

चित्रकलेचा नाद आहे, तेव्हां मला याबाबत बोलण्याचा थोडाबहुत हक्क आहे असें मी समजतें. सुंदर चित्रें काढण्याचा माझा प्रयत्न असतो, पण हल्लीच्या कांही पिकॅसोसारख्या चित्रकारांना सौंदर्याची गरज भासत नाही असें दिसतें. हा प्रकार थोडाबहुत नवकाव्यासारखाच आहे. काव्याला सौंदर्याची गरज काय, असें म्हणणारे हल्ली पुष्कळ लोक आहेत. मर्ढेकरांनी काव्याला गणिताचें स्वरूप देऊन त्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला होता, पण तो मोठासा यशस्वी झाला नाही आणि चित्रकलेच्या बाबतींत कोणीं तसा प्रयत्नही केलेला नाही.

मन नांवाचें शरीरापेक्षा वेगळें कांही आहे, असें सुलभाबाअी मानतात असें दिसतें, पण आमच्यासारखे बुद्धिवादी लोक तसें मानीत नाहीत. शरीराचीं सगळीं कार्यें मेंदूच्याच आधाराने चालत असतात, पण त्यांपैकी ज्या कार्यांची आपल्याला जाणीव होते त्यांना आपण मानसिक म्हणतों. हा अेक सोयीचा शब्द आहे, पण त्यावरून मन असें वेगळें कांही तरी आहे असें होत नाही. पण हा मानसशास्त्रांतला मूलभूत मतभेद आहे आणि तो आत्मा, अीश्वर, वगैरेंच्या अस्तित्वासारखाच वादग्रस्त राहणार असें दिसतें. धार्मिक लोकांनी अीश्वर आहे म्हणावें आणि आम्ही नाही म्हणावें, पण दोघांचींही मतें वादाने बदलणें अशक्य दिसतें.

विचार केल्याशिवाय जें काय मनांत येअील तें ताबडतोब करून टाकायचें, तज्ञांचा देखील सल्ला घ्यायचा नाही, लोकमताची तर पर्वा कधीच करायची नाही, या अेरावी धोरणामुळें कांग्रेस सरकारची किती वेळा फजीती होते याची गणती करणें कठिण. मुंबईसरकार तसेंच आणि केंद्र सरकार पण तसेंच. अिंग्लंडांत शिक्षणाच्या संस्थांकरतां वर्षाचे तीन भाग करण्याची पद्धत आहे आणि अिंग्लंडांत असेल तें चांगलें असलेंच पाहिजे, म्हणून यांनीही वर्षाचे तीन भाग करण्याविषयीं हुकूम सोडला. आपल्याकडची हवा वेगळी आहे, ऋतु वेगळे आहेत, याचा विचार करायचें कारणच नाही ! अनेकांनी या हुकुमाविरुद्ध तक्रार केली, पण लोकांना काय कळतें आहे,

आम्ही काय ते सर्वज्ञ, तेव्हां तक्रारींकडे लक्ष कशाला द्यायचें ? आणि आतां तो हुकूम मागें घेऊन पुन्हा मूळचीच व्यवस्था अंमलांत येईल असा हुकूम काढावा लागावा, यासारखी नामुष्कीची गोष्ट कोणती ? पण आमच्या सरकारला त्याचें कांही वाटत नाही. आम्ही सत्ताधारी आहोंत, आम्ही वाटेल तें करूं. 'कर्तुमकर्तुम्' शक्ति आमच्या हातांत असतांना आम्ही कां पर्वा करावी ? पण आतां तरी त्यांना अक्कल फुटली, यांतच समाधान मानणें भाग आहे.

आगगाडीच्या व्यवस्थेंत हाच घोटाळा. पूर्वीचे वर्ग बदलून नवी वर्गवारी केली; त्या वेळींही पुष्कळांनी असा मूर्खपणा न करण्याबद्दल त्यांना बजावलें होतें. पण नाही, हातीं सत्ता असल्याचा उपयोग काय ? लोकांना नसेल पसंत, म्हणून काय झालें ? यांत लोकांचा संबंध काय ? पण नव्या व्यवस्थेनें नुकसान होऊं लागल्यावर तरी अधिकारी जागे झाले, आणि पुन्हा जुनीच व्यवस्था अमलांत आली. तरीपण प्रत्येक वेळीं हाच प्रकार होतो. अनुभवावरून देखील विचार करण्याची अक्कल सरकारला येत नाही. आज मुंबअीच्या उपनगरांतल्या लोकांना आगगाडींत दुसरा वर्ग नसल्यामुळें किती त्रास होतो, याची कल्पना अधिकाऱ्यांना कशी यावी ? ते जाणार मोटरीने किंवा विमानानें. आज पहिल्या वर्गांतल्या उतारूंना देखील उभें रहावें लागतें, मग तिसऱ्या वर्गांत पहायलाच नको. धडपड केल्याशिवाय सरळपणें गाडींत जागाच मिळत नाही, उभें रहायला देखील जागा मिळत नाही. दुसरा वर्ग पुन्हा सुरू करा, म्हणून लोक कंठशोष करीत आहेत, पण तें सरकारला कसें अैकूं जाणार ?

नवीन विक्रीकराला विरोध म्हणून मुंबअींत सर्व दुकानें बंद होतीं, औषधांची दुकानें देखील बंद. वास्तविक औषधांचीं दुकानें बंद करणें हा लोकांवर अत्याचार आहे. चहाचीं दुकानें आणि खाणावळी बंद झाल्या तर मनुष्य अेक दिवस उपास देखील काढील, पण औषधांचीं दुकानें बंद झाल्यावर अेखाद्यावर मरण्याचा सुद्धां प्रसंग येअील. हा रानटीपणा आहे,

पण संप म्हटला की संप, जास्त विचार कोण करतो? यापासून त्रास सरकारला होत नाही, लोकांना होतो. पण सरकारला अकल नसते तशीच संपवाल्यांना देखील नसतेच. सगळीं दुकानें बंद केलीं, यांतच त्यांना फुशारकी वाटते.

जैन आणि बौद्ध लोक जरी ओश्वर मानीत नाहीत, तरी आत्मा मानतात. अर्थात् ओश्वराप्रमाणेंच आत्म्याच्या अस्तित्वालाही कोणताही पुरावा नाही. तरीपण वर्ध्याच्या ' संगम ' मासिकाचे संचालक स्वामी सत्यभक्त म्हणतात, ( ऑगस्टचा अंक, पान १८८ ) ' आत्मा नित्य तत्व है अिस बातको सिद्ध करने के लिये यद्यपि पूरे प्रमाण नहीं मिलते, फिर भी आत्मा में स्वानुभव की जो शक्ति है, वह विज्ञान के ९२ तत्वों में से किसी में नहीं पाओी जाती, अिसलिये वह अेक स्वतंत्र तत्व मालूम होता है। ' म्हणजे आत्म्याची स्वानुभवाची शक्ति आधुनिक शास्त्रांत मानलेल्या ९२ मूलतत्वांपैकीं अेकांतही नाही, तेव्हां आत्मा हें वेगळें तत्व असावेंसें दिसतें. पण असें म्हटलें तर जी शक्ति अेका तत्वांत नसते, ती अनेक तत्वांच्या समागमाने उत्पन्न होऊं शकते. उदाहरणार्थ पाण्याचा पातळपणा अेकाही तत्वांत नाहीं, पण ऑक्सिजन व हायड्रोजन या दोन तत्वांच्या संगमानें तो उत्पन्न होतो हें सिद्ध आहे. मनुष्याचें शरीर मुख्यतः कार्बन, ऑक्सिजन, हायड्रोजन व नायट्रोजन या चार तत्वांनी बनलेलें आहे. तेव्हां त्यांत कोणत्या शक्ति असतील याचा अंदाज करतां येणार नाही. स्वानुभव म्हणजे स्वतःची जाणीव, ही अशीच अेक शक्ति आहे, त्याकरतां वेगळें तत्व मानण्याचें कांहीच कारण नाहीं. पण स्वामीजी मूळचे जैन आहेत, ते सुधारक झाले तरी मूळच्या कांही जैन कल्पना त्यांना सोडवत नाहीत, म्हणूनच ते आत्मा मानतात. त्याला शास्त्रीय पुरावा नाही हें तेही कबूल करतात.

तुझी **शारदा**

---

**समाजस्वास्थ्य** मासिक दर १४ तारखेला टपालांत पडतें. वर्गणी रु. ३, व्ही. पी. ने रु. ३-६-०

## आमचेकडे मिळणारा माल

**लॅवट डच कॅप**, रु. ६. **अमेरिकन**, रु. ८. **उभट टोपी**, रु. १॥. **कॉंट्रॅसेप्टॅलीन** ( देशी जेली, मोठी नळी ) रु. ३. **कोरोमेक्स जेली** ( अमेरिकन, मोठी नळी) रु. ५. **पिशव्या**, ४ आणे, ८ आणे, १० आणे, रु. १।. **भोंवऱ्याची पिचकारी**, रु. ७. **राअिटयूब** ( रोगप्रतिबंधक ), रु. १-२-०, डझनास रु. १३.

**राइट एजन्सी**, १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई ४.

**प्रो ना. सी. फडके** यांचीं पुस्तकें :—

**प्रतिभासाधन**, रु. ५. **महात्मा गांधी**, रु. १॥. **किशोर-कथा**, रु. १॥. **भरतीची लाट** ( कादंबरी ), रु. ४. **माझ्या साहित्यसेवेंतील स्मृति** भाग २ रा, रु. ३. **शाकुंतल** ( जप्त झालेली कादंबरी ) रु. ४.

**राअिट अेजन्सी**, १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई ४.

## आयुर्वेद सेवा संघ, नाशिक,

या संस्थेने तयार केलेल्या धातुपौष्टिक वड्या "**कंदर्प वृष्य पाक** " ( वड्या ) अर्धा शेर पाकांत सुमारें चाळीस वड्या येतात. १ वडी सकाळीं व १ वडी रात्रीं झोंपतांना, याप्रमाणें २० दिवस हें धातुपौष्टिक औषध खाऊन वर कप, अर्धा कप दूध पीत जावें. अेक रत्तल वड्यांची किंमत ट. खर्चासह रु. ७-१४-०. मुंबईंतील विक्री केंद्रें – ( १ ) दि सूर्यकिरण फार्मसी लि०, १७३ गिरगांव रोड, मुंबई-४. ( २ ) डॉ. देव्हारे सर्वौषधी संग्रहालय, पोलीस चौकी मारुतीजवळ, दादर, मुंबई-२८.

Registered No. B 2289.

## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. क्लैब्याची मीमांसा, किंमत रु. ६, ट. ख. ८ आणे
२. आधुनिक आहारशास्त्र, किं. १॥ रु, ट. ख ८ आणे
३. आधुनिक कामशास्त्र [ सचित्र ], ९ वी आवृत्ति किंमत रु. ४, ट. ख. ८ आणे.
४. संततिनियमन [सचित्र], १० वी आ. १। रु. ट. ख.७ आ.
५. गुप्त रोगांपासून बचाव, ४ थी आ.रु.१, ट.ख.७आणे.
६. 'समाजस्वास्थ्य' मासिकांतील निवडक लेख, भाग २ रा [ वर्षें ४-९-६ ], किं. २-०-०, ट. ख.८ आ.
७. त्वचेची निगा, किं. ८ आ., ट. ख. ७ आ.
८. गुरुबाजी ( नाटक ), किं. ८ आ., ट. ख. ७ आणे
९. वेश्याव्यवसाय, किं. २ रु., ट. ख. ८ आ.
१०. तेरा गोष्टी, किं. १ रु. ट. ख. ७ आ.
११. न्यायाचा शोध (नाटक), किं १ रु., ट. ख. ७ आ.
१२. पॅरिसच्या परी (दुसरी आवृत्ति) रु. ३., ट.. ख. ८ आणे

### डॉ. के. भा. लेलेकृत

१. बाहेरख्यालीचे दुष्परिणाम, २ री आ., किं. ९ आ.
२. मूळव्याध, किं. ४ आ.

### श्री. शकुंतला परांजपेकृत

Three years in Australia, Rs. 3/15. Postage As. 8

राइट एजन्सी, नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, मुंबई नं. ४.

मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रेस, (मुंबई) लिमिटेड, ३५, ताडदेव रोड, मुंबई-७
मुद्रक व प्रकाशकः—रघुनाथ धोंडो कर्वे, राइट एजन्सी,
नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, गिरगांव, मुंबई-४